एकाधिक असुरक्षिततेसह शहरी जीवन: मुंबई महानगर प्रदेशातील शहरी गरीबांवर कोविड-१९ चा प्रभाव

हा अहवाल जून २०२० मध्ये जाहीर झालेल्या अंतरिम अहवालाचा पाठपुरावा आहे.

संपूर्ण अहवाल इंग्रजीमध्ये उपलब्ध आहे



कोविड -१९ दरम्यान मुंबई महानगर प्रदेशातील शहरी गरीबांमध्ये हक्क आणि सवलतींची उपलब्धी

कार्यकारी अहवाल

> "या गोष्टी अशाच आणखी किती दिवस चालू राहणार? व्यवसाय नाही, बाकी काहीच चालू नाही. आम्ही कुठून पैसे आणणार? आम्ही कशाच्या जोरावर पोट भरणार? आम्हांला पुढे असेच जगावे लागले तर आमच्याकडे काहीच शिल्लक राहणार नाही."
> **- शीला, मुंबईच्या पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी भागातील झोपडपट्टीत राहणारी पथ विक्रेती**

कोविड-१९ महामारी आणि देशभर झालेल्या लॉकडाऊनमुळे शहरी गरिबांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. आधीपासून अस्तित्वात असलेली असुरक्षितता आणि ओळखपत्रे, कल्याणकारी अधिकार आणि सामाजिक सुरक्षा यांची उपलब्धता याबाबतच्या दरीची तीव्रता लॉकडाऊनमुळे आणखीच वाढली. अशा परिस्थितीत त्वरित मदतकार्य आणि साहाय्य ही काळाची गरज होती. **अशा बिकट परिस्थितीमध्ये समुदायांवर कशा प्रकारे परिणाम झाला, त्यांच्या कोणत्या प्रकारच्या मदतकार्याची गरज होती आणि अधिकार, कल्याणकारी योजना व दीर्घकालीन पुनर्वसन यांची उपलब्धता कशा प्रकारे सुधारता येईल, याबाबत सखोल तपास करणे गरजेचे होते.** सदर अभ्यास बहुआयामी उत्तरे असणाऱ्या वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या संकल्पनेवर आधारलेला आहे. वरील प्रश्न पुढील उद्दिष्टांमध्ये विभागण्यात आले आहेत:

i. मदतकार्य पुरविण्यात येणाऱ्या कुटुंबांमध्ये अस्तित्वात असलेली असुरक्षितता जाणून घेणे

ii. लॉकडाउनच्या परिणामाचे मॅपिंग करणे

iii. आधीपासून अस्तित्वात असलेल्या अधिकारांची व्याप्ती आणि शासकीय मदतकार्याची सध्याची उपलब्धता जाणून घेणे

iv. समावेशक आणि सहयोगात्मक पुनर्वसन यांकरिता शिफारशी मांडणे

आम्ही जून २०२० मध्ये "कोविड-१९ कालावधीमध्ये मुंबई महानगर क्षेत्रातील शहरी गरिबांना अधिकार आणि मदतकार्य यांची उपलब्धता" असे शीर्षक असलेला अंतरिम अहवाल प्रकाशित केला. याद्वारे आम्ही ७,५१५ कुटुंबांमधील लोकांना उपलब्ध झालेल्या अधिकारांबाबत आणि शासकीय मदतकार्याबाबत संक्षिप्त आढावा सादर केला. त्यावर आधारित मुंबई महानगर क्षेत्रातील शहरी गरिबांच्या लघुकालीन आणि दीर्घकालीन समस्यांबाबत कशा प्रकारे सुधारणा करता येईल, याविषयी आम्ही सरकारी अधिकाऱ्यांना आणि निर्वाचित प्रतिनिधींना शिफारशी सादर केल्या.

त्यानंतर परिस्थिती बदलली आहे - टप्प्याटप्प्याने 'अनलॉकिंग' करण्यात आले आहे, मदतकार्य पॅकेजचा विस्तार करण्यात आला आहे आणि बंद पडलेली कामे पुन्हा कार्यान्वित करण्यात आली आहेत. स्थलांतरित कामगारांसाठी अस्तित्वात असलेली ट्रेन आता कार्यरत नाही, शासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना नोव्हेंबर २०२० पर्यंत वाढविली आहे, आणि रेशन कार्ड उपलब्ध नसलेल्या जनतेला जुलै २०२० पर्यंत त्यांच्या आधार क्रमांकाच्या आधारे रेशनचे धान्य उपलब्ध करुन देण्यात आले.

सदर अहवालामध्ये मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत (एमएमआर) असलेल्या १० शहरांमधील ३९,५६२ प्रतिसादकांकडून (रिस्पॉन्डन्ट्स) प्राप्त माहितीच्या आधारे काढलेल्या तपशीलवार निष्कर्षांचा समावेश आहे. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे:

i. दि. २० मार्च ते ३० जून २०२० या कालावधीत मदतकार्य मिळालेल्या मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत (एमएमआर) १० शहरांमधील २५,५८९ कुटुंबांचे सर्वेक्षण; ज्यामध्ये 'मुंबई मोबाईल क्रशेस'सोबतच्या भागीदारीतून मदतकार्य देण्यात आलेल्या १६ बांधकाम साईटवरील ४,८०५ कुटुंबांचा समावेश

ii. दि. १४ ते ३० मे २०२० या कालावधीत एमएमआरमधील १३,८०१ प्रवाशी स्थलांतरित कामगारांचे सर्वेक्षण;

iii. दि. १९ मे ते १७ जून २०२० या कालावधीत घेतलेल्या १७२ सहभागींच्या सविस्तर मुलाखती

सदर संख्यात्मक माहिती मदतकार्याच्या वाटपादरम्यान संकलित करण्यात आली असल्याने नमुन्याचा आकार (सॅम्पल साईज) भिन्न आहे आणि आंतरशहर तुलना टाळण्यात आल्या आहेत.

आमच्या वर नमूद उद्दिष्टांवर आधारित अभ्यासामुळे शहरी गरीब समुदायांची या कालावधीतील स्थिती, त्यांना शासकीय मदतकार्याची झालेली उपलब्धता आणि आधीपासून अस्तित्वात असलेल्या कल्याणकारी अधिकारांची व्याप्ती याबाबत जाणून घेण्यास मदत होते. विविध समुदायांवर झालेल्या लॉकडाऊनच्या परिणामावर या दोन्ही बाबींचा थेट प्रभाव पडला आहे. अधिकार आणि मदतकार्य उपलब्धता, अनौपचारिक कामगार, स्थलांतर, त्यांच्या निवासस्थानामुळे उद्भवलेली भयानक अस्थिरता अशा विषयांवर चर्चा करणाऱ्या प्रकरणांच्या माध्यमातून सदर निष्कर्ष विषयवार मांडण्यात आले आहेत. या विषयांवरून काढलेल्या निष्कर्षांचा आणि सहभागींनी मांडलेल्या मागण्यांचा आधार घेत योग्य शिफारशी करण्यात आल्या आहेत.

त्यापैकी काही निष्कर्षांच्या सारांशाचे विषयवार वर्गीकरण आणि प्रस्तुती खालीलप्रमाणे करण्यात आली आहे:
अधिकार आणि मदतकार्य उपलब्धता

> “दूध किंवा त्यासारखे अतिरिक्त अन्नपदार्थ विकत घेणे आमच्यासारख्या कुटुंबांसाठी अशक्यप्राय गोष्ट आहे. त्यामुळे आम्ही हल्ली अशा गोष्टी खातच नाही. केवळ डाळ आणि पाण्यावर आम्ही आणखी किती वेळ तग धरू शकू?”
> **- जुही, तुर्भे, नवी मुंबईतील एका झोपडपट्टीत राहणारी मुलगी**

अन्नाची गरज आणि सार्वजनिक वितरण प्रणालीच्या (पब्लिक डिस्ट्रिब्युशन सिस्टिम/पीडीएस) मर्यादा

> “आम्हांला विषाणूची भीती वाटतेच. किंबहुना, त्यापेक्षा आम्हांला उपाशी मरण्याची अधिक भीती वाटते.”
> **- वैशाली, मुंबईच्या पूर्व उपनगरातील नटवर पारेख नामक आर अँड आर वसाहतीत राहणारी एक घरकाम करणारी महिला**

- सर्वेक्षण करण्यात आलेल्या १४,१३३ कुटुंबांपैकी ८२.७८ टक्के कुटुंबांनी ‘पीडीएस’मध्ये नावनोंदणी केली होती आणि त्यांच्याकडे रेशनकार्ड अस्तित्वात होते. केवळ ४५.४९ टक्के कुटुंबांचेच रेशनकार्ड एमएमआर अंतर्गत नोंदणीकृत असल्याचे आमच्या संकलित माहितीतून निदर्शनास आले. १६ बांधकाम साईटवर राहणाऱ्या ४,८०५ कुटुंबांपैकी केवळ १०.३८ टक्के कुटुंबांकडेच ते सध्या रहात असलेल्या शहरात नोंदणी केलेले रेशनकार्ड होते.
- रेशनकार्डधारकांपैकी सुमारे १८ टक्के व्यक्तींनी सांगितले की, त्यांनी त्यांचे रेशनकार्ड त्यांच्या आधारकार्डाला अद्याप जोडलेले नाही.
- रेशनकार्डधारकांच्या घेतलेल्या मुलाखतींमधून निदर्शनास आले की, केवळ रेशनकार्ड जवळ आहे म्हणून रेशन धान्याची थेट व पुरेशी उपलब्धता होतेच असे नाही. मुलाखत घेतलेल्या बऱ्याच व्यक्तींनी सांगितले की, संपूर्ण लॉकडाऊनच्या काळात त्यांनी केवळ वरणभात, साखरभात, भाकऱ्या/चपात्या किंवा खिचडीवर पोटाची खळगी भरून तग धरला आहे.
- स्वयंपाकाच्या इंधनाची उपलब्धताही अतिशय आव्हानात्मक बनली आहे आणि त्यामुळे अन्नाविषयीची असुरक्षितता आणखी तीव्र झाली आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेसाठी केवळ दारिद्र्यरेषेखालील कुटुंबेच पात्र असल्याने बहुतांश शहरी गरिबांना अजूनही स्वयंपाकाच्या इंधनाच्या उपलब्धतेसाठी पैसे मोजावे लागत आहेत.
- जीवनावश्यक अन्नपुरवठ्याच्या उपलब्धतेमध्ये अनेक अडथळे आहेत; तसेच उत्पन्न व बचतीचे साधन गेल्याने पैसे खर्च करण्याची लोकांची क्षमता अचानक घटली आहे. या दोन्हीच्या एकत्रित परिणामामुळे लॉकडाऊन काळात अनेक लोकांची मोठ्या प्रमाणावर उपासमार झाल्याचे आढळले आहे.

व्यापक आर्थिक असुरक्षितता आणि केवळ नाममात्र लोकांना डायरेक्ट कॅश ट्रान्सफर

"आमची जी काही थोडीबहुत बचत होती ती आता संपली आहे. लॉकडाऊन असाच चालू राहिला तर कोणाकडे पैसे शिल्लक राहतील?"
-शाजी, मुंबईच्या आयर्लंड सिटीतील एन्टोप हिल विभागातील एका झोपडपट्टीत राहणारा एक अपंग पथविक्रेता

- २१,५०४ कुटुंबांपैकी ५६.९१ टक्के कुटुंबांमधील कुटुंबप्रमुख रोजंदारीवर काम करीत होते, ३९.०५ टक्के व्यक्तींना मासिक वेतन मिळत होते आणि ४.६० टक्के व्यक्ती साप्ताहिक उत्पन्न कमवीत होते. लॉकडाऊन काळात काम उपलब्ध नसल्यामुळे लोकांना मजुरी मिळेनाशी झाली. परिणामी, अधिकतर लोकांमध्ये बिकट आर्थिक अडचणी निर्माण झाल्या.
- प्रधानमंत्री जन धन योजनेच्या (पीएमजेडीवाय) खातेधारक महिला आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये (बीओसीडब्ल्यू) नोंदणीकृत बांधकाम कामगार यांच्याकरिता मदतकार्य या अर्थी डायरेक्ट कॅश ट्रान्सफर्स सुरु करण्यात आल्या.
- आम्ही संकलित केलेल्या माहितीद्वारे निदर्शनास आले की, ६,४१८ कुटुंबांमधील (६३.२७ टक्के) किमान एका व्यक्तीचे बँक खाते होते, सर्वेक्षण करण्यात आलेल्या कुटुंबांपैकी ३,४१२ कुटुंबांमध्ये (२३.१३ टक्के) कुटुंबातील महिला सदस्याच्या नावे बँक खाते होते. मात्र, सदर बँक खाती ही कॅश ट्रान्सफर करण्यात आलेली पीएमजेडीवाय खातीच होती असे नाही.
- मुलाखत घेण्यात आलेल्या सहभागींपैकी ज्यांना कॅश ट्रान्सफर प्राप्त झाली आहे त्यांनी जमा झालेले पैसे काढताना त्यांना आलेल्या व्यावहारिक अडचणींबद्दल आणि एप्रिल, मे आणि जून महिन्यांमध्ये रु. ५०० इतकी अपुरी रक्कम मिळाल्याबद्दल चिंता व्यक्त केली.
- ज्यांना कॅश ट्रान्सफर मिळालेली नाही त्यांनी महत्वाच्या दोन समस्या सांगितल्या:
  i. कॅश ट्रान्सफर केवळ महिलांच्या नावे असलेल्या खात्यांसाठीच आहे हे ठाऊक नव्हते.
  ii. झिरो बॅलन्स खाते (म्हणजेच बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट अकाऊंट [बीएसबीडीए]) आणि पीएमजेडीवाय खाते यातील फरकाबद्दलची अनभिज्ञता; यांपैकी बऱ्याच जणांचे पीएमजेडीवाय खाते असल्याने ते कॅश ट्रान्सफरसाठी अपात्र ठरले.
- मुलाखती घेतलेल्या लोकांनी सांगितले की, त्यांच्याकडे अत्यल्प बचत आहे किंवा अजिबातच शिल्लक नाही. वाढत्या अस्थिरतेमुळे काही जणांनी स्वतःच्या मालकीच्या काही वस्तू विकल्या किंवा गहाण ठेवल्या. पूर्वी घेतलेल्या कर्जांमुळे लोकांना नवे कर्जही मिळत नव्हते. मालकांची/नियोक्त्यांची आर्थिक साहाय्य करण्याविषयी निरिच्छा होती आणि नातेवाईक व मित्रपरिवारही स्वतःच अडचणीत असल्यामुळे पैसे उधार देऊ शकत नव्हते, अशा समस्याही लोकांनी मुलाखतीदरम्यान व्यक्त केल्या.
- केवळ १२८ कुटुंबांमधील (१.५४ टक्के) सदस्यांचीच स्वयंसेवी समूहामध्ये (सेल्फ हेल्प ग्रुप्स/एसएचजी) नावनोंदणी झाली होती.

अनौपचारिक कामगारांना मदतकार्य आणि सामाजिक सुरक्षा यांची उपलब्धता

"लॉकडाऊनची अंमलबजावणी होणार असल्याचे आम्हांला ठाऊक नसल्याने आम्ही खरोखरच त्यासाठी वेगळे पैसे साठविले नव्हते. माझे पती रोजंदारीवर काम करतात. त्यामुळे आम्ही दिवसभर मिळणाऱ्या मिळकतीवर आमचा घरखर्च चालवितो."
-शायमा, मुंबईच्या पश्चिम उपनगरातील वांद्रे विभागातील एका झोपडपट्टीत राहणारी गृहोद्योगातील कामगार

अभ्यासानुसार निष्कर्षास आले की, १०९ प्रकारचे रोजगार समोर आले त्यापैकी अधिकतर (४५.५६ टक्के) बांधकामक्षेत्राशी निगडित होते, त्या पाठोपाठ १४.८ टक्के घरकामाशी संबंधित होते. ७.२७ टक्के लोक ड्रायव्हरचे, ३.८२ टक्के लोक पथविक्रेत्याचे आणि ०.८७ टक्के सफाई कामगारांचे काम करीत होते.

बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षेची मर्यादित उपलब्धता: (सर्वेक्षण केलेल्यांची संख्या: ६९३७; मुलाखत घेतलेल्यांची संख्या: २१)

- लॉकडाऊनमुळे बांधकामाची कामे अचानक ठप्प झाली. कामाची उपलब्धता कमी झाल्याने काम मिळायचे बंद

झाल्याचे बऱ्याचशा कामगारांनी व्यक्त केले आणि काही जणांनी कमी दराने काम करीत असल्याचेही सांगितले.

- सामाजिक सुरक्षा किंवा शासकीय मदत प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये (बीओसीडब्ल्यू) नोंदणी करणे सक्तीचे आहे. मात्र, हे अनेक कारणास्तव आव्हानात्मक आहे. एकाच नियोक्त्याकडून ९० दिवस रोजगार असल्याचे सिद्ध करणारे प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करणे सर्वात मोठे आव्हान आहे.
- एकाच बांधकामस्थळी बराच काळ सलग काम करणाऱ्या कामगारांना हे प्रमाणपत्र सादर करणे शक्य आहे. एमएमआर अंतर्गत १६ बांधकाम साईटवर काम करणाऱ्या ४,८०५ कामगारांपैकी केवळ ९६३ (२४.६४ टक्के) कामगार बीओसीडब्ल्यू - डब्ल्यूबीमध्ये नोंदणीकृत आहेत यांच्या तुलनेत स्वतंत्रपणे काम करणाऱ्या किंवा नाक्यावर मिळणाऱ्या कामावर अवलंबून असणाऱ्यापैकी फ़क्त ८७ (३.३२ टक्के) कामगार बीओसीडब्ल्यू - डब्ल्यूबीमध्ये नोंदणीकृत आहेत.
- मात्र, नोंदणीकृत असण्याचा अर्थ महाराष्ट्र बीओसीडब्ल्यू - डब्ल्यूबीकडून केवळ एकदा मिळणारी रु. २००० ची कॅश ट्रान्सफरची मदत उपलब्ध होईल असे नाही. नोंदणीकृत असल्याचे सांगितलेल्या ९६३ कामगारांपैकी केवळ २८४ (२९.४९ टक्के) कामगारांनाच कॅश ट्रान्सफर प्राप्त झाली आहे.

घरकाम करणाऱ्या कामगारांना सामाजिक सुरक्षा नाही (सर्वेक्षण केलेल्यांची संख्या: २२५३; मुलाखत घेतलेल्यांची संख्या: २०)

- महाराष्ट्र काही निवडक राज्यांपैकी एक राज्य आहे जे घरकामाला कायदेशीर मान्यता देते आणि जिथे सामाजिक सुरक्षेसाठी महाराष्ट्र घरगुती कामगार कल्याणकारी मंडळ (एम.डी.डब्ल्यू.डब्ल्यू.बी.) या नावे कल्याणकारी मंडळ अस्तित्वात आहे. मात्र, केवळ १५२ (११.८९ टक्के) घरकाम कामगारच 'एम.डी.डब्ल्यू.डब्ल्यू.बी.'कडे नोंदणीकृत असल्याचे कामगारांनी सांगितले.
- एम.डी.डब्ल्यू.डब्ल्यू.बी. कायद्यानुसार घरकाम कामगारांची नोंदणी झाल्याची खातरजमा करून त्यांना सामाजिक सुरक्षा देणे मंडळाला बंधनकारक आहे. दुर्दैवाने या दोन्ही बाबतीत मंडळ अपयशी ठरले आहे. सद्य परिस्थितीत कामगारांना त्यांचा पगार दिला जाण्याबाबत नियोक्त्यांना जबाबदार धरले जाईल, याबाबतही मंडळाने खातरजमा केलेली नाही.
- घरकाम कामगारांपैकी बऱ्याच जणांनी सांगितले की, कामावर जाऊ न शकल्याने त्यांना त्यांचे वेतन किंवा मजुरी मिळाली नाही आणि त्यांना नोकरीविषयी असुरक्षिततेचा अनुभव आला. काही जणांनी पर्यायी रोजगारदेखील शोधला होता. "आता आमच्याकडे पैसे शिल्लक नाहीत. माझी मुले भीक मागतात आणि त्यातून आम्हांला काही पैसे किंवा अन्न मिळते. काही दिवस मी भंगार किंवा कचरा वेचून पैसे कमविण्याचा प्रयत्न करते." असा अनुभव मुंबईतील आयर्लंड सिटीमधील माटुंगा विभागात बेघर झालेल्या नसरीन नावाच्या घरकाम करणाऱ्या महिलेने सांगितले.

पथविक्रेत्यांसाठी कर्जे (सर्वेक्षण केलेल्यांची संख्या: ५८१; मुलाखत घेतलेल्यांची संख्या: १२)

- सर्वेक्षण केलेल्यांपैकी ५८१ (३.८२ टक्के) कुटुंबे रस्त्यावर विक्री करण्यावर अवलंबून होती. स्वयंनियुक्त कामगार (सेल्फ एम्प्लॉईड वर्कर्स) या नाते पथविक्रेते त्यांचे अर्थार्जन करण्यासाठी अनेक घटकांवर अवलंबून असतात, जसे विक्रीसाठी मालाची खरेदी करता यावी याकरिता बचत, बाजारपेठेचे कार्य, सार्वजनिक वाहतूक, सार्वजनिक स्थळे आणि लोकांची खरेदी करण्याची क्षमता. यांच्या अनुपस्थितीत उत्पन्नामध्ये कमालीची घट झाल्याचे सर्व पथविक्रेत्यांनी सांगितले.
- सर्वेक्षण करण्यात आलेल्या ३०३ (७०.१४ टक्के) पथविक्रेत्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे प्रधानमंत्री स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेतून चालू भांडवलासाठीची कर्जे उपलब्ध करून देणारी बँक खाती आहेत. मात्र, त्यासाठी नोंदणी प्रमाणपत्र दाखल करणे इ. पात्रतेचे निकष कर्जाच्या उपलब्धतेत अडथळा निर्माण करतील. तसेच दि. २४ मार्च २०२० पूर्वी पथविक्रेते असल्याचे सिद्ध करू शकणाऱ्या व्यक्तीच यासाठी पात्र आहेत. लॉकडाऊन काळात रोजगार गेल्यामुळे ज्या व्यक्तींनी पथविक्री सुरु केली आहे, अशांचा विचार

करण्यात आलेला नाही.

- याखेरीज (शहरी स्थानिक संस्थेच्या [यूएलबी] मध्यस्थीतून) हे कर्ज विक्री करण्याच्या अधिकाराला (राईट टू व्हेन्ड) जोडले न गेल्यास उच्चाटनापासून मुक्त असण्याची हमी न देणारे कर्ज त्याच्या मूळ उद्देशालाच निष्प्रभ करते.

ठराविक प्रकारच्या सफाई कामगारांसाठी आरोग्य विमा (सर्वेक्षण केलेल्यांची संख्या: १३३; मुलाखत घेतलेल्यांची संख्या: १०)

- सफाई कामगारांमध्ये सफाईशी निगडित काम करणाऱ्या सर्व कामगारांचा समावेश होतो. यामध्ये स्वयंनियुक्त कचरा उचलणारे कामगार, स्थानिक शासनाने रस्ते, सार्वजनिक प्रसाधनगृहे, आसपासचा परिसर यांची साफसफाई करण्यासाठी किंवा कचरा संकलन प्रक्रियेमध्ये काम करण्यासाठी थेट किंवा कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केलेल्या व्यक्तींचा समावेश होतो.
- आत्मनिर्भर भारत अभियान मदतकार्याच्या घोषणेअंतर्गत केंद्र शासनाने शासकीय रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचारीवर्गाला आरोग्य विमा प्रदान केला आहे. महाराष्ट्र शासनाने स्वच्छता विभागाच्या शासकीय, खाजगी, कंत्राटी किंवा आउटसोअर्स केलेल्या कर्मचारीवर्गाला आरोग्य विमा प्रदान केला आहे. याखेरीज, सफाईशी निगडित काम करणाऱ्या कामगारांना इतर कोणतेही सामाजिक सुरक्षा लाभ उपलब्ध नाहीत.
- ज्यांच्या मुलाखती घेतल्या गेल्या होत्या ते सर्वजण कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आले होते आणि त्यांना नोकरीची किंवा वेतनाची हमी नव्हती. ज्यांना लॉकडाऊन काळात काम मिळाले होते त्यांनीही सांगितले की, त्यांना मिळणाऱ्या वेतनाचा खूप विलंब झाल्याने त्यांच्याकडे काहीच पैसे शिल्लक राहिले नव्हते. लॉकडाऊनमुळे आपल्या अर्थार्जनात पूर्णपणे खीळ बसल्याचे कचरा उचलणाऱ्या कामगारांनी सांगितले.

काम आणि वेतन बंद होणे, नानाविविध असुरक्षितता आणि परिणामतः होणारे स्थलांतर

- बंद झालेले काम आणि न मिळणारे वेतन आणि वाढती असुरक्षितता अशा कारणांमुळे अनेक कामगारांना नाईलाजास्तव त्यांच्या गावी परत जावे लागले. आम्ही दि. १४ ते ३० मे २०२० दरम्यान गावी परतणाऱ्या १३,८०१ कामगारांचे सर्वेक्षण केले.
- त्यांनी घरी परतण्यासाठी उपलब्धता, खिशाला परवडणे आणि तत्परता यांच्यावर आधारित पर्यायांचा विचार करून दळणवळणाच्या विविध साधनांचा वापर केला. आमच्याकडील संकलित माहितीतून निष्पन्न झाले की, ७००१ (५०.७३ टक्के) लोक ट्रेनने, १४१६ (१०.२६ टक्के) ट्रकने आणि ११८४ (८.५८ टक्के) कामगार पायी आपापल्या घरी परतले. चार कामगार एमएमआर ते आसाम चालत चालले होते तर २४ कामगार थेट नेपाळपर्यंत चालत चालले होते!
- सर्वाधिक स्थलांतरित कामगार उत्तर प्रदेशला परतण्याचा प्रयत्न करीत होते तर त्या पाठोपाठ राजस्थान आणि महाराष्ट्रातील इतर ठिकाणी स्थलांतरित कामगार परत जात होते.
- परिस्थिती आणखी बिकट झाल्यास मुलाखती देणाऱ्यांपैकी काही कामगार लवकरच आपापल्या गावी परतण्याच्या विचारात होते. अजूनही एमएमआरमध्ये राहिलेल्या लोकांकडे परत जाण्यासाठी काहीही साधनसुविधा उपलब्ध नव्हत्या. गावी परतलेल्या कामगारांपैकी काहींनी “परिस्थिती पूर्ववत झाल्यास” पुन्हा परतण्याची आपली इच्छा असल्याचे सांगितले.

अपुऱ्या निवासस्थानांमुळे विविध असुरक्षिततेचे अनुभव

> “आम्ही दैनंदिन वापरासाठी कर्ज काढून पैसे उभे केले आहेत. यातील अधिकतर रक्कम पाणी आणि प्रसाधनगृहे याकरिता खर्च होतात.”
> **- ऋषभ, मुंबई आयर्लंड सिटीमध्ये बेघरपणाचा अनुभव घेत असलेला २७ वर्षीय बेकार सफाई कामगार**

लॉकडाऊन काळामध्ये काम, अन्न आणि मदतकार्य यांच्या उपलब्धतेशी संबंधित आव्हानांसोबतच लोकांना त्यांच्या निवासस्थानांबाबतही अतिरिक्त आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. निवासस्थानाशी निगडित परिस्थितीची ही जाण युवाच्या कार्याच्या केंद्रस्थानी आहे आणि या महामारीमुळे ही

बाब आणखी ठळकपणे अधोरेखित झाली. आम्ही केलेल्या सर्वेक्षणांमध्ये आणि मुलाखतींमध्ये विविध परिस्थितीत राहणाऱ्या लोकांचा समावेश होता. यामध्ये बेघर झालेल्या, कार्यस्थळी राहणाऱ्या, (कच्च्या, अर्ध कच्च्या किंवा पक्क्या घरांच्या) झोपडपट्टीत राहणाऱ्या, आर अँड आर वसाहतींमध्ये राहणाऱ्या, आदिवासी पाड्यांमध्ये किंवा गावठाणांमध्ये राहणाऱ्या लोकांचा समावेश होता. तसेच या अहवालामध्ये महिला, तृतीयपंथीय व्यक्ती आणि मुले यांना भेडसावणारी असुरक्षितता आणि त्यांच्या मागण्या सविस्तरपणे पुढे मांडण्यात आल्या आहेत.

- भाड्याने राहणाऱ्या लोकांना मासिक भाडे भरणे अशक्य होत होते पण त्यांना भाडे भरणे भाग पडत होते. बेघर आणि भाडोत्री राहणाऱ्या लोकांना घरातून हाकलून देण्याची भीती तर होतीच पण त्याचसोबत रहिवाश्याचा पुरावा नसल्यामुळे त्यांना त्यांचे अधिकार आणि शासकीय मदतकार्य यांपासूनही वंचित राहावे लागण्याची शक्यता होती. बेघर लोकांना रहिवाश्याचा पुरावा देणे अशक्य होत होते तर भाडोत्री लोकांना त्यांचे घरमालक रहिवाश्याचा पुरावा देण्यास मनाई करीत होते.
- उत्पन्नाचा मार्गच खुंटल्यामुळे या लोकांना स्वतःला आणि त्यांच्या घराला पावसाळ्याचा सामना करण्यासाठी तयार करता आले नाही.
- लॉकडाऊन काळात विविध निवासस्थानांमध्ये राहणाऱ्या सहभागींसाठी पाणी, प्रसाधनगृहे आणि वीज यासारख्या महाग आणि अपुऱ्या असणाऱ्या मूलभूत गरजा आर्थिक बोजा बनल्या.
- लॉकडाऊन काळात आरोग्यसेवेची आणि औषधोपचाराची उपलब्धता दुरापास्त बनली होती. यामुळे अनेक लोकांना त्यांच्या चालू असलेल्या उपचारादरम्यान औषधे घेता आली नाहीत.

वरील निष्कर्ष आणि सद्यस्थितीबद्दलच्या लोकांच्या मागण्या यांच्या आधारे सदर अहवालातील शिफारशी करण्यात आल्या आहेत. अशा बिकट प्रसंगी शहरी गरिबांचे अस्तित्व टिकून रहावे आणि दीर्घकालीन लढ्यासाठी त्यांना सक्षमपणे उभे राहता यावे यासाठी भविष्यात कराव्या लागणाऱ्या कृतीसाठी या दोहोंद्वारे दिशा मिळेल.

या अहवालातून महामारीच्या प्रारंभिक काळात झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीचे यथार्थ दर्शन होऊ शकते. लॉकडाऊन जोपर्यंत अस्तित्वात राहतील तोपर्यंत आणि त्याही पश्चात या बिकट परिस्थितीवर मात करण्यासाठी दीर्घकालीन बदल घडवून आणणे हा एकमेव शाश्वत मार्ग आहे. यासाठी विद्यमान प्रणालीला जबाबदार धरण्यासाठी हे निष्कर्ष निर्णायक ठरतील, अशी आम्हांला आशा आहे.

शिफारशी

देशात सर्वाधिक कोविड-१९ बाधित व्यक्तींची संख्या असलेल्या महाराष्ट्रातील परिस्थिती सदर अहवालाला अंतिम स्वरूप देत असेपर्यंत चिंताजनकच आहे. त्याचसोबत लॉकडाऊन शिथिल करण्यात येत आहे. मात्र उदरनिर्वाहाच्या साधनांचे भवितव्य अंधारात असताना गरिबांच्या अस्तित्वाबद्दल अनिश्चितता निर्माण झाली आहे. ही कुटुंबे संकटात आणि कर्जाच्या ओझ्याखाली आहेत. त्यांचे कुपोषण होत असून त्यांच्याकडील बचतही संपुष्टात आली आहे. संकलित माहितीवरून निदर्शनास येते की, या वंचित कुटुंबांना त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने घोषित केलेल्या अनेक मदतकार्य पॅकेजची किमान उपलब्धता आहे. याआधीच घोषित करण्यात आलेल्या मदतकार्य पॅकेजेसना विचारात घेऊन केंद्र, राज्य आणि स्थानिक अशा तीनही शासन स्तरावर शिफारशी करण्यात आल्या आहेत. सदर पॅकेजेसची उपलब्धता सुकर व्हावी आणि अंमलबजावणीतील त्रुटी भरून काढता याव्यात या दृष्टीने सदर शिफारशी करण्यात आल्या आहेत. यामध्ये काही शिफारशी तात्कालिक गरजा भागविण्याहेतू आवश्यक असलेल्या तात्कालिक कृती आहेत तर काही शिफारशी कोविडपश्चात परिस्थिती हाताळण्याच्या दृष्टीने मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना या अर्थी सुचविण्यात आल्या आहेत.

१. गरजूंपर्यंत मदत पोहोचण्याच्या सुनिश्चितीबद्दल शिफारशी

१.१ अन्नविषयक मदतकार्य आणि अधिकार यांच्या उपलब्धतेची सुनिश्चिती

I. सार्वजनिक वितरण प्रणालीचे (पीडीएस) वैश्विकीकरण आणि आपत्कालीन रेशन कार्ड्स प्रदान करणे

केंद्र शासन: सार्वजनिक वितरण प्रणालीचे (पीडीएस) वैश्विकीकरण केंद्रीय स्तरावरून करण्यात येऊन कोणत्याही नागरिकाला, संबंधित कागदपत्रे त्याच्याकडे उपलब्ध असोत वा नसोत, त्याला रेशनचे धान्य वाटप करण्यासाठी राज्य शासनास बंधनकारक करण्यात आले पाहिजे. यामुळे लाखो गरजू लोकांना त्यांचे निवासाचे स्थान, कागदपत्रांची स्थिती किंवा उत्पन्नाची वर्गवारी यांचे निकष न लावता उदरनिर्वाहासाठी अन्न मिळविता येईल.

राज्य शासन: आपत्कालीन रेशनकार्डांच्या माध्यमातून पीडीएसची वैश्विक उपलब्धता सुकर करणारा शासकीय आदेश (जीआर) काढण्यात आल्यास राज्यातील एकही नागरिक भुकेने त्रस्त राहणार नाही. संबंधित कागदपत्रे सोबत नसणाऱ्यांना आपत्कालीन रेशन कार्ड्स मिळविण्यास परवानगी द्यावी. रेशनकार्ड जवळ नसल्यामुळे ज्या बिगर रेशनकार्डधारकांनी आधारकार्डाच्या आधारे शासकीय मदतकार्याद्वारे वाटप केलेले धान्य घेतले आहे अशांची यादी रेशन कार्यालयांकडे आता उपलब्ध आहे. आपत्कालीन रेशनकार्ड्सचा लाभ नक्की कोणाला घेता येऊ शकतो याचा शोध घेण्यासाठी या माहितीचा उपयोग करता येऊ शकतो. सध्याच्या निवासस्थानानुसार आपत्कालीन रेशन कार्ड्सचे वाटप करण्याहेतू रास्त भाव दुकानांमध्ये/ रेशन दुकानांमध्ये द्रुतगती प्रक्रिया (फास्ट ट्रॅक प्रोसेसेस) नव्याने अंमलात आणण्यात याव्यात. रेशन कार्यालयांशी संपर्क साधून सदर आपत्कालीन रेशन कार्ड्स नियमित करण्यासाठी आणि 'एक राष्ट्र एक रेशन' (ओएनओआर) योजनेशी सदर रेशनकार्ड जोडण्यासाठी लोकांना १२ महिन्यांचा अवधी देण्यात यावा.

स्थानिक शासन: प्रत्येक एफ.पी.एस.ला त्याच्या क्षेत्राबाबत अधिकारक्षेत्र असावे. यामुळे आपत्कालीन रेशन कार्ड्स निर्मिती सुकर होईल आणि एकाच कुटुंबाची अनेक रेशनकार्डस बनण्याच्या धोका टाळता येईल. एकट्या राहणाऱ्या व्यक्ती, कुटुंबे किंवा समूहामध्ये एकत्र राहणारे स्थलांतरित कामगार यांची नोंदणी करण्याची

आणि त्यांच्यासाठी एकच आपत्कालीन रेशन कार्ड्स जारी करण्याची परवानगी एफ.पी.एस.ना देण्यात यावी. या कार्यात तृतीयपंथीय व्यक्ती, एकल महिला, असहाय्य जेष्ठ नागरिक आणि इतर असुरक्षित समूहातील लोकांना प्राधान्य देण्यात यावे.

II. वार्षिक उत्पन्नानुसार, मात्र उत्पन्नामध्ये झालेल्या मोठ्या नुकसानाला विचार घेऊन, रेशन धान्यासाठी असलेल्या पात्रतेचे पुनर्मूल्यांकन करणे

केंद्र शासन: अनौपचारिक कामगारांचा हातून गेलेला रोजगार आणि संपलेली बचतीची रक्कम यांचा विचार करता लोकांचे उत्पन्नाच्या निकषांचे आणि संबंधित रेशन पात्रतेचे पुनर्मूल्यांकन करण्याचे आदेश राज्य शासनांना देण्यात यावेत.

राज्य शासन: प्राधान्य कुटुंबांमधील (पी.एच.एच.) रेशनकार्डधारकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. ५९००० वरून १ लाख इतकी वाढविण्याकरिता शासकीय आदेश (जीआर) जारी करण्यात यावा. शहरी क्षेत्रातील सर्व केशरी रेशनकार्डधारकांचे पुनर्वर्गीकरण पी.एच.एच. या नावे करण्यात यावे. तसेच, वार्षिक उत्पन्न जेमतेम १ लाखापेक्षा थोडेसे अधिक असणाऱ्या अनेक पांढऱ्या रेशनकार्डधारकांच्या सध्याच्या उत्पन्नात कमालीची घट झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांची रेशनची पात्रता ठरविण्याहेतू त्यांच्या सध्याच्या उत्पन्नाचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ भूतकाळातील उत्पन्नाच्या आधारे रेशन पात्रता मर्यादित न ठेवता सद्यपरिस्थितीत गेल्या काही महिन्यांमध्ये घटलेल्या उत्पन्नाच्या आधारे लोकांच्या गरजांना साजेसा प्रतिसाद देत रेशन पात्रता ठरविणे संयुक्तिक आहे.

III. सुस्थितीत कार्यरत असलेली ऑनलाईन पोर्टल्स आणि योजनांबद्दल जनजागृती यांद्वारे मदतकार्याची उपलब्धता अधिक सुकर करणे

केंद्र शासन: रेशनकार्डचे वितरण, पुनर्नवीकरण आणि दुरुस्ती यांची प्रक्रिया डिजिटल करण्यासाठी आजवर सुरु करण्यात आलेली अनेक ऑनलाईन पोर्टल्स अजूनही कार्यरत नाहीत. शासकीय कार्यपद्धतीतील विलंब आणि मध्यस्त एजंट्स यांच्यामुळे रेशन कार्डाबाबत होणारे अडथळे टाळण्यासाठी सदर ऑनलाईन पोर्टल्स त्वरित सुस्थितीत आणून निरंतर कार्यरत ठेवणे गरजेचे आहे. यामुळे ‘एक राष्ट्र एक रेशन’ (ओ.एन.ओ.आर.) योजनेच्या फास्ट ट्रॅकिंगचीही सुनिश्चिती होईल.

स्थानिक शासन: राज्य शासनाने रेशनकार्ड वाटपाबाबत आजवर अनेक जी.आर्स जारी केले आहेत. मात्र त्याच्या तपशीलाविषयी अजूनही प्रचंड तफावत दिसून येते आणि ज्यांना रेशन कार्डाची सर्वाधिक आवश्यकता आहे त्यांच्याकडे याविषयी स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. विविध भाषांमधून आणि विविध माध्यमांमधून (प्लॅटफॉर्म्समधून) पी.डी.एस.च्या उपलब्धतेबद्दल स्पष्ट माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध असली पाहिजे.

लोकांना अन्नविषयक अधिकारांची उपलब्धता वाढावी यासाठी अस्तित्वात आणलेल्या नव्या योजनांविषयी एफ.पी.एस. मालकांचे ज्ञान वाढण्याहेतू त्यांना प्रशिक्षण देण्यात आले पाहिजे. एफ.पी.एस. मालकांची जबाबदारी आणखी वाढावी यासाठी एफ.पी.एस.च्या नियमितपणे तपासण्या करण्यात याव्यात. तक्रार निवारण प्रणालींविषयी जनजागृती झाली पाहिजे आणि तक्रारींचे त्वरित निवारण झाले पाहिजे.

IV. सार्वजनिक वितरण प्रणालीमधून (पीडीएस) वाटप करण्यात येणाऱ्या अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तूंमध्ये वैविध्य

केंद्र शासन: मदतकार्याद्वारे वाटप करण्यात येणाऱ्या धान्यांच्या तरतुदींमध्ये तांदूळ/गहू आणि एक डाळ या पलीकडे जाऊन त्याचा विस्तार करण्याची नितांत गरज आहे. रेशनच्या तरतुदींमध्ये अन्नधान्यांव्यतिरिक्त पुढील जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करण्यात आला पाहिजे.

- कांदे, बटाटे, स्वयंपाकाचे तेल, दूध पावडर, मसाले
- प्रधानमंत्री उज्वला योजनेची (पीएमयूवाय) समावेशक अंमलबजावणी साध्य होईपर्यंत रॉकेलचा रेशन किटमध्ये समावेश करण्यात आला पाहिजे.
- साबण, मास्क्स, सॅनिटायझर्स आणि सॅनिटरी

नॅपकिन्स यांचा समावेश असलेले हायजीन किट

राज्य शासन: (आधी नमूद केल्यानुसार) महाराष्ट्र शासनाने लोकांच्या पोषकतत्त्वांच्या गरजांची पूर्तता करणारे रेशन किट विकसित केले पाहिजे.

स्थानिक शासन: रेशनमार्फत वाटप करण्यात येत असलेल्या अन्नधान्यांची आणि जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता, गुणवत्ता आणि तत्पर वाटप होत असल्याची सुनिश्चिती आणि देखरेख व्हावी, या हेतूने स्थानिक शासनाने गरजू समुदाय आणि रास्त भाव दुकाने यांच्यासोबत संयुक्तपणे काम केले पाहिजे.

ज्या भागामध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांची संख्या विपुल प्रमाणात आहे तिथे अधिक लक्ष केंद्रित करून सवलतीच्या दरात देण्यात येणारे अन्न किंवा शिव भोजनालयासारख्या कॅन्टीन सेवा त्या भागातील गरजूंना लॉकडाऊन काळानंतरही अधिक विकेंद्रीय पद्धतीने उपलब्ध करून देण्यात याव्यात.

V. अंगणवाड्या आणि शासकीय शाळा त्यांचा पोषण संबंधित जबाबदाऱ्या दुरस्थपणे कायम ठेवत असल्याची सुनिश्चिती करणे

केंद्र शासन: मुलांना शाळेतून मिळणारे मध्यान्ह भोजनाच्या आणि आयसीडीएस केंद्रांमधून मिळणाऱ्या पोषणविषयक सेवांच्या अनुपस्थितीत मुलांच्या उपाशी राहण्याच्या पातळीत लाक्षणिक वाढ झाली आहे. त्यामुळे त्या मुलांच्या आयांच्या आणि दायांच्या मनातील भीतीमध्ये आणि असुरक्षिततेमध्ये भर पडली आहे. लॉकडाऊन काळात मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना पोषण आणि अन्न सुरक्षा मिळण्याकामी भारत सरकारने शासकीय शाळांना आणि आयसीडीएस केंद्रांना सक्रिय भूमिका पार पाडणे सक्तीचे करावे.

राज्य शासन: ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळांमधून आजवर माध्यान्ह भोजनाचा लाभ घेतला आहे त्या मुलांच्या पालकांकडे रेशन कार्ड असो वा नसो, त्यांना मासिक तत्त्वावर कोरडे रेशन धान्य वाटप करणे सक्तीचे आणि सुनिश्चित करणारा शासकीय आदेश (जीआर) जारी करण्यात यावा. ज्या अंगणवाडी सेविकांनी लॉकडाऊनपूर्व काळात सहा वर्षांखालील बालकांच्या वाढीची देखरेख केली आहे आणि गरोदर मातांच्या व स्तनदा मातांच्या आरोग्यविषयक गरजा भागविल्या आहेत, त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या दूरध्वनीवरून चौकशी करून आणि गरजांचे मूल्यांकन करून पुढेही पार पाडणे बंधनकारक करावे. एकात्मिक बाल विकास सेवेद्वारे (इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस/आईसीडीएस) घरी घेऊन जाणाऱ्यांच्या रेशन धान्याची मासिक तरतूद करण्यात यावी.

स्थानिक शासन: शालेय मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अन्न सुरक्षा आणि पोषण प्रदान करण्याकामी अंगणवाड्यांना आणि शासकीय शाळांना त्यांच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडता येत असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी शाळांनी आणि आईसीडीएस केंद्रांनी समुदायांसोबत सहयोग करून त्यांना साहाय्य केले पाहिजे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवली पाहिजे.

VI. सर्व पीएचएच कुटुंबांना उज्वला गॅस योजना उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करणे

केंद्र शासन: सध्या रेशन मिळणाऱ्या अनेक कुटुंबांना स्वयंपाकाचा गॅस विकत घेणे परवडत नसल्याने त्यांना मिळालेल्या रेशन धान्यापासून स्वयंपाक करणे अशक्य झाले आहे. उज्वला गॅस योजनेद्वारे ऑनलाईन नोंदणी आणि त्वरित जोडणी करण्यास परवानगी दिली पाहिजे. प्राधान्य कुटुंबांना (पीएचएच) प्रधानमंत्री उज्वला योजनेसाठी (पीएमयूवाय) पात्र ठरविल्यास सदर योजनेच्या तरतूदीचा विस्तार करून ती दारिद्र्यरेषेखाली (बीपीएल) वर्गीकृत नसलेल्या शहरी गरीब कुटुंबांपर्यंतही पोहोचविता येईल.

राज्य शासन: या योजनेसाठी झालेल्या ऑनलाईन नोंदण्या पीडीएसशी जोडता येऊ शकतात. त्यामुळे रास्त भाव दुकानांमधून रेशन घेणाऱ्या लोकांना या योजनेच्या नोंदणीबद्दलच्या सूचना आणि माहिती त्याच ठिकाणी रेशन स्वीकारताना मिळू शकतील.

स्थानिक शासन: स्थानिक शासनाने रेशन कार्यालयाशी सहयोग करून गरजू कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅसची उपलब्धता असल्याचे आणि सदर गॅस त्यांना कार्यक्षम पद्धतीने उपलब्ध होत असल्याचे सुनिश्चिती करावे.

१.२ मूलभूत जीवनावश्यक गोष्टींच्या खरेदीसाठी लोकांकडे खरेदीची क्षमता असल्याचे सुनिश्चित करण्यास्तव डायरेक्ट कॅश ट्रान्सफरच्या रक्कमेत वाढ करणे

केंद्र शासन: डायरेक्ट कॅश ट्रान्सफर ही काळाची गरज आहे. येत्या ६ महिन्यांसाठी प्रति कुटुंब दरमहा ५००० रुपये इतकी रोख रक्कम ट्रान्सफर केल्यास लाखो लोक लॉकडाऊनच्या काळातही तग धरू शकतील. ‘पीएम केअर फंड’ या उद्देशासाठी वापरता येऊ शकतो. यामुळे लोकांच्या मूलभूत कौटुंबिक गरजा नक्कीच भागविल्या जातील. खास करून महिलांच्या हिताला केंद्रस्थानी ठेऊन पीएमजेडीवायमध्ये केलेल्या मदतकार्याच्या तरतुदी तृतीयपंथीय लोकांनाही देण्यात याव्यात. शासनाकडून डायरेक्ट कॅश ट्रान्सफर करण्यात येत असलेल्या या बँक खात्यांवर बँकांचे शुल्क लागू करण्यात येऊ नयेत.

स्थानिक शासन: कॅश ट्रान्सफर करण्याहेतू बँक खाते उघडून गरिबांना, विशेषतः वंचित व्यक्तींना प्रयत्नपूर्वक आर्थिकदृष्ट्या मुख्य प्रवाहामध्ये सामावून घेतले गेले पाहिजे. स्थानिक समुदायांशी भागीदारी केल्यास १००% लोकांना बँकिंग सेवा प्राप्त होत असल्याची सुनिश्चिती करता येईल.

१.३ डायरेक्ट कॅश ट्रान्सफर सक्षम करण्यासाठी बांधकाम कामगारांच्या फास्ट-ट्रॅक नोंदणीची प्रक्रिया सुनिश्चित करणे

राज्य शासन: इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये (बीओसीडब्ल्यू) नोंदणीकृत सर्व बांधकाम कामगारांना रु. २,००० इतकी रक्कम डायरेक्ट ट्रान्सफर करणार असल्याचे महाराष्ट्र शासनाने जाहीर केले आहे. सध्या सदर मंडळाकडे इमारत उपकराच्या माध्यमातून संकलित केलेला रुपये ७४८२.३३ कोटी इतका निधी उपलब्ध आहे. ज्या कामगारांची अद्याप नावनोंदणी झालेली नसेल त्यांना साध्या बिगर-नोकरशाही प्रक्रियेद्वारे नावनोंदणी करण्यास प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे आणि सदर नावनोंदणीसाठी ९० दिवस काम केल्याचे प्रशस्तीपत्र पुराव्यास्तव जोडण्याचा विद्यमान नियम शासनाने रद्द केला पाहिजे. यामागील कारण असे की, सध्याचा रोजगार हातून गेलेले अनेक लोक बांधकामक्षेत्राकडे वळू शकतात आणि जे लोक लॉकडाऊनपूर्वी बांधकामक्षेत्रातच होते त्यांना जवळजवळ ४ महिने कामच उपलब्ध नव्हते. सदर मंडळामध्ये (प्राधान्याने ऑनलाईन) नावनोंदणी करण्यासाठी फास्ट-ट्रॅक नावनोंदणी प्रक्रिया अस्तित्वात आणल्यास बांधकामक्षेत्रातील कामगारांना प्रचंड मदत होईल. कामगार संघटना, बिगर शासकीय संस्था (एनजीओ) आणि स्वयंसेवी समूह (व्हॉलंटरी ग्रुप्स) या घटकांना सदर प्रक्रियेमध्ये साहाय्य करण्यास्तव पाचारण करता येऊ शकेल.

स्थानिक शासन: ९० दिवस काम केल्याचे प्रशस्तीपत्र पुराव्यास्तव जोडण्यास सक्षम नसल्यामुळे ज्या कामगारांना बीओसीडब्ल्यू-डब्ल्यूबी बोर्डाकडे नावनोंदणी करण्यात अपयश आले असेल त्यांची पडताळणी स्थानिक प्रभाग कार्यालयाकडून होणे गरजेचे आहे. सदर कामगारांपैकी काही जण एकाच बांधकामस्थळाशी आणि सहयोगी बांधकाम व्यावसायिकाशी निगडित आहेत, मात्र, त्यांच्यापैकी अनेक जणांना केवळ एकच नियोक्ता/कंत्राटदार नाही (ज्यांना ‘नाका कामगार’ असे म्हणतात). अशा कामगारांच्या पडताळणीकरिता ‘गेल्या १२ महिन्यांमधील कार्यस्थळे’ यांसारखे काही निकष असावेत (मात्र ‘९० दिवस काम केल्याचे प्रशस्तीपत्र’ हा निकष नसावा.)

१.४ प्रधानमंत्री स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेची त्वरित उपलब्धता सक्षम करणे

राज्य शासन: प्रधानमंत्री स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेतून चालू भांडवलासाठीची कर्जे उपलब्ध करून देताना विशेषतः दि. २५ मार्च २०२० पूर्वी पथ विक्रेते असल्याचे सिद्ध करण्याबाबत नोकरशाहीतील काही अडथळे उत्पन्न होऊ शकतात. नव्याने स्वयं नियुक्त विक्रेते शोधण्यासाठी एक नवी प्रणाली अस्तित्वात आणणे गरजेचे आहे आणि अशा नव्या विक्रेत्यांनाही चालू भांडवलासाठीची कर्जे उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या बदलत्या आशयानुसार राज्य शासनाचे पीएम स्वनिधी योजनेबाबतचे नियम बदलण्यात आले पाहिजेत.

स्थानिक शासन: नगरपालिका क्षेत्रांमध्ये पथविक्री करणाऱ्या विक्रेत्यांचे सर्वेक्षण गतिमान पद्धतीने

करणे गरजेचे राहील. तसेच स्थानिक शासनाने बँका, पथविक्रेत्यांच्या संघटना (युनियन्स) आणि फेडरेशन्स यांच्याशी भागीदारी करून सदर कर्जासाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेबद्दल व्यापक जनजागृती करावी.

१.५ उदरनिर्वाहास चालना देण्यासाठी एन.एल.यू.एम. ने स्वयंसेवी समूहांच्या (सेल्फ हेल्प ग्रुप्स/एसएचजी) सदस्यत्वाच्या निकषांबद्दल पुनर्विचार करावा.

केंद्र शासन: आगामी महिन्यांमध्ये पुनर्वसनाची उपाययोजना या अर्थी (आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत जाहीर करण्यात आलेले) राष्ट्रीय शहरी उदरनिर्वाह मोहीम (नॅशनल अर्बन लाईव्हलीहुड्स मिशन/एनएलयूएम) कर्ज लाभ अधिकाधिक स्वयंसेवी समूहांपर्यंत (सेल्फ हेल्प ग्रुप्स/ एसएचजी) पोहोचतील, याची सुनिश्चिती करणे गरजेचे राहील. यामुळे वैयक्तिकरित्या किंवा सामूहिकरीत्या उत्पन्ननिर्मिती सुनिश्चित होईल. मात्र, स्वयंसेवी समूहांच्या (सेल्फ हेल्प ग्रुप्स/एसएचजी) सदस्यत्वाचे निकष आणखी विस्तृत केले पाहिजेत. सध्या 'एनएलयूएम'मध्ये नोंदणीकृत असलेल्या एसएचजीमधील ७० टक्के सदस्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) असल्याचे सिद्ध करणे आवश्यक आहे. सध्याच्या आशयानुसार या निकषाचा विस्तार करणे क्रमप्राप्त आहे.

स्थानिक शासन: एसएचजी संस्थांनी स्थानिक पातळीवर काम उपलब्ध असल्याचे आणि आवश्यक सेवा त्यांच्यापर्यंत पोहोचत असल्याचे सुनिश्चित केल्यास त्या स्थानिक प्रशासनामध्ये एक प्रबळ बलस्थान ठरू शकतात. गेलेल्या उदरनिर्वाहाच्या पुनर्बांधणीसाठी महिलांनी साहाय्याची मागणी केली आणि एखाद्या विद्यमान कार्यक्रमाचे सबलीकरण करून हे साध्य करता येऊ शकते. समुदाय आधारित संस्थांच्या माध्यमातून अशा जास्तीत जास्त गरजूंपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचता येऊ शकते. स्थानिक शासनाच्या विविध योजनांतर्गत नोंदणीकृत असलेल्या एसएचजींपर्यंत स्थानिक शासनाद्वारे एनएलयूएमचे लाभ पोहोचविणे अतिशय महत्वाचे ठरेल.

१.६ सफाई कामगारांसाठी जाहीर केलेल्या सामाजिक सुरक्षेचा विस्तार करणे

केंद्र शासन: सफाईकार्याच्या अनौपचारिक स्वरूपाला स्वीकृती देऊन केंद्र शासनाने विविध प्रकारच्या सफाई कामगारांसाठी एक नवीन कायदा अस्तित्वात आणला पाहिजे. टाकाऊ कचरा गोळा करणे, कंत्राटी कामगार, इ. गटातील सफाई कामगारांना सामावून घेण्यासाठी स्वच्छता किंवा सफाईकार्याची विद्यमान व्याख्या विस्तृत करण्यात यावी. या कायद्यान्वये सामाजिक सुरक्षेचे लाभ प्रदान करणे बंधनकारक केले पाहिजे. सफाई कामगारांच्या आरोग्यास असलेले गंभीर धोके विचारात घेता त्यांना प्रदान करण्यात येणारी सामाजिक सुरक्षा केवळ (एएनबीए अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या) आरोग्य विम्यापुरती मर्यादित न राहता सफाई कामगारांना भेडसावणाऱ्या बहुविध नागवणूकीला किंवा वंचितपणाला हाताळणारी असली पाहिजे.

राज्य शासन: राज्यातील सर्व सफाई कामगारांची नोंदणी आणि सामाजिक सुरक्षा यांची सुनिश्चिती करण्याहेतू एका कल्याणकारी मंडळाची निर्मिती करावी.

स्थानिक शासन: सर्व प्रकारच्या सफाई कामगारांनाही आपत्कालीन रेशन कार्ड्स प्रदान करण्यात यावीत आणि ज्यांचा रोजगार गेला आहे त्यांना उदरनिर्वाहाचे पर्यायी विकल्प प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात यावेत.

२. देशभरातील स्थलांतरित कामगारांना साहाय्य करण्यास्तव शिफारशी

२.१ कायदेशीर आणि सामाजिक संरक्षण सुनिश्चित करणे

स्थलांतरित कामगार स्वतःच्या आणि जिथे स्थलांतरित होऊन काम करतात अशा दोन्हीही राज्यांकडून प्रदान करण्यात येणाऱ्या सुरक्षा कवचापासून कशा प्रकारे वंचित राहतात, हे सध्याच्या संकटातून प्रकर्षाने जाणवले. आणि म्हणूनच या अदृश्यपणे अविरत कार्य करणाऱ्या मनुष्यबळाचा सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा यंत्रणेमध्ये समावेश करणे अतिशय महत्वाचे आहे. असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा, २००८ अंतर्गत असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा मंडळाची स्थापना करण्यासारख्या विद्यमान कायदेशीर तरतुदी सध्या महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात नाहीत. असंघटित कामगारांना त्वरित मदतकार्य देण्यासाठी आणि

सदर कायद्यामध्ये नमूद केलेल्या योजनांना साहाय्य पुरविण्यासाठी मंडळाची तातडीने स्थापना करणे गरजेचे आहे आणि विनियोग न झालेल्या, तसेच अतिरिक्त मिळालेल्या निधीचे असंघटित कामगारांसाठी असलेल्या राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा निधी अंतर्गत वाटप झाले पाहिजे. लाभांची पोर्टेबिलिटी साध्य करण्यासाठी आणि नोकरशाहीतील विलंब कमी करण्यासाठी स्वयं नोंदणी आणि नोंदणीचे डिजिटायझेशन केले पाहिजे.

या व्यतिरिक्त राज्य आणि स्थानिक शासनांनी कामगारांमध्ये त्यांच्या अधिकारांविषयी जनजागृती करण्यास प्राधान्य देणे गरजेचे आहे.

२.२ स्थलांतरित कामगारांच्या सेन्सस डेटाबेसचा वापर करणे

कामगारांच्या मूळ राज्याने सार्वजनिक जनगणनेदरम्यान संकलित करण्यात येणाऱ्या स्थलांतरित करून जाणाऱ्या कामगारांच्या लोकसंख्या डेटाबेसचा वापर केला पाहिजे. आंतरराज्य कामगार कायद्यांतर्गत नमूद केलेल्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेच्या तरतुदींबाबत कामगार स्थलांतरित होऊन काम करतात त्या राज्याशी वाटाघाटी करण्यासाठी याची गरज भासेल. यामध्ये किमान वेतन, प्रवास भत्ता, विस्थापन भत्ता, गृह, आरोग्य सेवा इ. चा समावेश होतो. भविष्यातील सामाजिक कल्याण उपक्रमांचे सुत्रीकरण करण्याकामी हा डेटाबेस प्रभावी ठरेल. या प्रक्रियेमध्ये प्रोफाईलिंग करणे कटाक्षाने टाळले पाहिजे.

२.३ स्थलांतरित कामगारांसाठी आरोग्य सुरक्षा सुनिश्चित करणे

दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कुटुंबांमधील असंघटित कामगारांना लागू असणाऱ्या राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना (आरएसबीवाय) सारख्या योजनांमध्ये लाभांची पोर्टेबिलिटी करण्याची मुभा असून त्यामध्ये रु. ३०,००० प्रति कुटुंब (पाच व्यक्तींचे कुटुंब) इतका विमा मिळतो. सदर विमा योजनेमध्ये सर्व असंघटित कामगारांचा समावेश करण्यात यावा आणि डोमिसाईलचे (रहिवाश्याचा दाखला) निर्बंध न लादता आरोग्यसेवांची वैश्विक उपलब्धता करण्यात यावी.

३. महाराष्ट्रातील कामगारांना उदरनिर्वाहाची आणि सामाजिक सुरक्षेची सुनिश्चिती करण्याबाबतच्या शिफारशी

३.१ शहरी रोजगार हमी योजनेची निर्मिती करणे

आगामी महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावरील कामगार बेरोजगार राहणार असल्यामुळे शहरी रोजगार हमी योजनेची निर्मिती करण्यात आली पाहिजे. शहरी क्षेत्रातील अत्यावश्यक असलेल्या मूलभूत सेवा आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा (पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर) यांच्या सुधारणेचे सुलभीकरण करणाऱ्या रोजगाराशी सदर योजना जोडण्यात आली पाहिजे.

३.२ स्वयं नियुक्त कामगारांसाठी व्याजमुक्त कर्जे पुरविणे

लॉकडाऊन काळात स्वयं नियुक्त कामगारांची सर्व बचत संपुष्टात आली असल्याचा विचार करता अशा कामगारांना भांडवल उपलब्ध होत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी प्रोत्साहनपर पॅकेज जाहीर करण्यात आले पाहिजे. उदरनिर्वाहाची पुनर्बांधणी करण्यास्तव सदर बिनव्याजी कर्जे बँकांच्या माध्यमातून पुढील १२ महिन्यांसाठी उपलब्ध असावीत. सदर कर्जे केवळ एनएलयूएम अंतर्गत नोंदणीकृत एसएचजीना प्रदान करण्यात येणाऱ्या सांपार्श्विक-मुक्त (कोलॅटरल-फ्री) कर्जा पुरते आणि पथविक्रेत्यांना देण्यात येणाऱ्या खेळते भांडवल कर्जापुरते मर्यादित राहणार नाही.

३.३ घरकाम करणाऱ्या कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा पुनर्स्थापित करणे

महाराष्ट्र काही निवडक राज्यांपैकी एक राज्य आहे जे घरकामाला कायदेशीर मान्यता देते आणि जिथे घरकाम कामगारांना सक्तीने सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र घरगुती कामगार कल्याण मंडळ (एमडीडब्ल्यूडब्ल्यूबी) या नावे कल्याण मंडळ अस्तित्वात आहे. सदर मंडळ त्वरित कार्यरत केले पाहिजे. सर्व

घरकाम कामगारांची फास्ट ट्रॅक नोंदणी करण्यास सुरुवात केली पाहिजे आणि त्यासोबतच (कायद्यांतर्गत नमूद) सामाजिक सुरक्षा लाभ प्रदान करण्यात आले पाहिजेत. लॉकडाऊन काळात कामगारांना वेतन देत राहण्याविषयी नियोक्त्यांना जबाबदार धरण्यात येईल, असा आदेश जाहीर करणारा जीआर जारी करण्यात आला पाहिजे.

३.४ महाराष्ट्र तृतीयपंथीय कल्याणकारी मंडळाचे कार्य नीट होत असल्याची सुनिश्चिती करणे

रोजगाराच्या इतर संधींची अनुपलब्धता आणि सामाजिक काळिमा यांमुळे समाजातील तृतीयपंथीय व्यक्ती भीक मागण्यावर आणि वेश्याव्यवसाय करण्यावर अवलंबून असतात. उदरनिर्वाहाचे हे दोन्ही मार्ग सद्यपरिस्थितीत पूर्णतः बंद आहेत. महाराष्ट्र तृतीयपंथीय कल्याणकारी मंडळाचे कार्य व्यवस्थितपणे सुरु करण्यात आले पाहिजे आणि तत्परतेने तृतीयपंथीय व्यक्तींचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी केली पाहिजे. मंडळाने सर्व तृतीयपंथीय व्यक्तींची पीडीएस आणि पीएमडीजेवाय योजनांमध्ये नावनोंदणी होत असल्याची सुनिश्चिती केली पाहिजे आणि अशा व्यक्तींची इतर मूलभूत ओळखपत्रे द्रुतगतीने तयार केली पाहिजेत. यासोबतच कल्याणकारी मंडळामार्फत त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात आली पाहिजे.

४. लॉकडाऊन काळात एमएमआरमधील मुलांना साहाय्य करण्यासाठीच्या शिफारशी

I. महामारीमुळे ६ महिन्यांपेक्षा लहान असलेल्या मुलांचे लसीकरण थांबले आहे. अशा मुलांचे ठराविक वेळेत लसीकरण होत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी
अशा सर्व मुलांच्या बाबतीत कसून पाठपुरावा करण्यात आला पाहिजे.

II. सहा वर्षांखालील बालके, गरोदर माता आणि स्तनदा माता यांच्या वाढीची देखरेख सामान्यपणे अंगणवाडी सेविका करतात. सध्याच्या लॉकडाऊन काळात ही बाब दूरध्वनीवरून करणे गरजेचे आहे आणि पोषकतत्वांच्या आवश्यकतांची तरतूद प्रभाग अधिकाऱ्यांसोबत केलेल्या भागीदारीतून एकात्मिक बाल विकास सेवेद्वारे (इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस/आईसीडीएस) आणि चाईल्डलाईन (मुलांसाठी असलेली आपत्कालीन हेल्पलाईन) करण्यात यावी. या दोन्ही ठिकाणी अन्नाची गरज असलेल्या मुलांचे अनेक कॉल्स प्राप्त झाले आहेत.

III. नगरसेवकांच्या नेतृत्वाखाली प्रभाग स्तरावर बाल संरक्षण समिती कार्यान्वित करण्यात यावी. यामुळे मुलांना स्वास्थ्य, पोषण आणि संरक्षण देण्याकामी स्थानिक प्रणालींमध्ये समन्वय साधला जाईल.

IV. आगामी महिन्यांमध्ये अनौपचारिक वसाहती, रस्त्यावर आणि असुरक्षित परिस्थितीत राहणाऱ्या मुलांना शिक्षणाची उपलब्धता अतिशय महत्वाची ठरणार आहे. जर शैक्षणिक संस्थांसाठी लॉकडाऊन कायम राहिल्यास नगरपालिकेच्या आणि खाजगी शाळांनी तंत्रज्ञानाची मोफत उपलब्धता करण्याविषयी आवश्यक व्यवस्था करावी.

V. आगामी काळात स्थलांतरित मुलांच्या समावेशाची आणि त्यांच्या अधिकारांच्या पूर्ततेची सुनिश्चिती करण्यासाठी वार्षिक सर्व शिक्षण अभियानामध्ये (एसएसए) स्थलांतरित मुलांसाठीच्या तरतुदीही समाविष्ट करण्यात याव्यात.

५. एमएमआर क्षेत्रात लवचिक निवासस्थानांची बांधणी करण्याविषयीची शिफारशी

अभ्यासातील निष्कर्षांवरून हे निदर्शनास आले आहे की, अपुऱ्या निवासस्थानांमधील रहिवाश्यांना अगोदरच अस्तित्वात असलेल्या असुरक्षिततेमुळे आपत्ती काळात इतरांपेक्षा अतिरिक्त तोट्यांना आणि गैरसोयींना सामोरे जावे लागते. परिणामी, अशा व्यक्तिंना आपत्तीच्या परिणामांमुळे अधिक असुरक्षित वाटू लागते. शहरी गरिबांसाठी पुरेशी निवासस्थाने उपलब्ध असल्याची सुनिश्चिती करण्यास प्राधान्य देण्यात यावे. परिणामतः त्वरित अंमलबजावणी करावयाच्या उपाययोजना आणि दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

५.१ लोकांच्या निवासस्थानाबद्दलच्या निकडीच्या समस्या त्वरित सोडविल्या जात असल्याची सुनिश्चिती करण्यास्तव तातडीने करावयाच्या उपाययोजना

I. महामारीमुळे बेघरांसाठी उभारण्यात आलेली निवारागृहे बेघर रहिवाश्यांच्या सुरक्षेची आणि स्वास्थ्याची सुनिश्चिती करण्यासाठी पुढेही चालू ठेवण्यात आली पाहिजेत आणि एनएलयूएमच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बेघरांसाठी त्यांचा विनियोग केला पाहिजे.

II. ज्या लोकांनी झोपडपट्टीतील घरांची सुधारणा करण्यासाठी गृहकर्जे घेतली आहेत त्यांच्या गृहकर्जांसाठी त्या कालावधीकरिता कर्जमाफी देण्यात आली पाहिजे.

III. जे लोक भाड्याने रहात आहेत त्यांना जर भाडे न भरल्यामुळे बळजबरीने घराबाहेर काढले जात असेल किंवा रहिवाश्याचा दाखला नसल्यामुळे कोणत्याही अधिकारांपासून वंचित ठेवले जात असेल तर अशा बिकट प्रसंगी त्यांना साहाय्य करण्याहेतू हेल्पलाईन आणि पाठपुराव्याचे साहाय्य पुरविण्यात यावे.

IV. जून २०२० महिन्यापर्यंत वैध असलेल्या महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासकीय आदेशाला (जीआर) कायम करीत भाड्याविषयी कठोर अधिस्थगन (कर्जफेड पुढे ढकलण्याचा कायदेशीर अधिकार) जारी करण्यात यावे.

V. आपत्ती व पुनर्वसन कालावधीमध्ये शासकीय आणि खाजगी विद्युतपुरवठा करणाऱ्या संस्थांशी समन्वय साधून सर्व शहरी गरीब वसाहतींसाठी विद्युत भाडे आकारणी ६ महिन्यांसाठी पुढे ढकलावी.

VI. सर्व भागांमध्ये पाण्याची आणि स्वच्छतेची उपलब्धता करण्यात आली पाहिजे. स्थानिक शासनाने सर्वांना पाणीपुरवठा केला जात असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या आदेशाचा आणि इतर न्यायिक आदेशाचा अवलंब करावा. तसेच सार्वजनिक शौचालयांचा मोफत वापर करण्याची परवानगी देण्यासाठी शासनाने जारी केलेल्या शासकीय आदेशाची (जीआरची) अंमलबजावणी करावी. सर्व सार्वजनिक शौचालये नियमितपणे निर्जंतुक केली पाहिजेत.

VII. वंचित क्षेत्रामध्ये आपत्कालीन आरोग्य सेवा उपलब्ध असल्या पाहिजेत, सार्वजनिक क्षेत्रांचे निर्जंतुकीकरण करण्यात आले पाहिजे आणि फिरती आरोग्यसेवा वाहने (मोबाईल हेल्थ व्हॅन्स) व सर्वांसाठी मोफत आरोग्यसेवा उपलब्ध असली पाहिजे.

VIII. सध्या आरोग्य केंद्रांमध्ये आणि रुग्णालयांमध्ये क्षयरोग, कर्करोग आणि एचआयव्ही यासाठीची औषधे फारच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. संबंधित रुग्णांना सदर औषधे सोयीस्करपणे आणि प्राधान्याने मिळाली पाहिजेत.

IX. सद्यस्थितीत सर्वसाधारण सार्वजनिक दळणवळणाच्या सेवा अनुपलब्ध असताना आदिवासीपाडया सारख्या दुर्गम भागांमध्ये वैद्यकीय आणीबाणी हाताळण्यासाठी (हेल्थ इमर्जन्सी) खास रुग्णवाहिकांची तरतूद असली पाहिजे.

X. आपत्ती व्यवस्थापन व्यूहरचनेचा भाग म्हणून, विशेषतः सध्याच्या आपत्तीजनक परिस्थितीत, कच्च्या बांधकामाच्या घरातील रहिवाश्यांना आणि आदिवासीपाडयातील रहिवाश्यांना पावसाळ्यापूर्वी घराची तयारी आणि डागडुजी करण्यासाठी मदत पुरविली पाहिजे.

५.२ एमएमआर क्षेत्रात लवचिक निवासस्थानांची सुनिश्चिती करण्यास्तव दीर्घकालीन उपाययोजना

I. शहरी गरीब वसाहतींमध्ये आपत्तीशी सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या तयारीमध्ये सुधारणा होण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन योजना, २०१६ अनुसार समुदायांवर आधारित सूचना प्रणाल्या अस्तित्वात आणल्या पाहिजेत. एकल महिला, तृतीयपंथीय व्यक्ती आणि निराधार जेष्ठ नागरिक व्यक्ती यांचा समुदायांवर आधारित संपर्कजाळ्यांमध्ये अंतर्भाव केले पाहिजे. यामुळे आपत्तीकाळात त्यांना सुरक्षा मिळण्याची

आणि मदतकार्य वाटपामध्ये व पुनर्वसनामध्ये त्यांचा समावेश झाल्याची सुनिश्चिती होईल.

II. महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम अन्वये झोपडपट्ट्यांना अधिसूचित करण्यात आले पाहिजे आणि सर्व मूलभूत सेवा (पाणी, आरोग्य, रस्ते, सांडपाण्याच्या संस्था) रहिवाश्यांच्या संख्येनुरूप देण्यात येत असल्याचे सुनिश्चित केले पाहिजे. सध्या ही अतिशय दीर्घ आणि किचकट प्रक्रिया आहे आणि झोपडपट्ट्यांमधील लोकांना पुरेशी स्वच्छता आणि दर्जेदार जीवन सुनिश्चित करणाऱ्या मूलभूत सुविधा मिळण्यापासून प्रतिबंध करतात.

III. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली पाहिजे की जेणेकरून झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प ‘राष्ट्रीय इमारत कोड’ने (नॅशनल बिल्डिंग कोड) निर्देशित केलेली घनता कायम राखतील. (उच्च फ्लोअर स्पेस इंडेक्स/ एफएसआय म्हणजे अधिक घनता आणि झोपडपट्टी पुनर्वसन इमारतींबाबत याचा अर्थ होतो की, लहान घरांमध्ये तडजोड केलेल्या परिस्थितीमध्ये अधिक लोकांचे राहणे.)

IV. नगररचनेने सद्यस्थितीत ठोस पावले उचलली पाहिजेत. महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियमानुसार झोपडपट्ट्यांचे नियोजन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून (एसआरए) केले जाते. झोपडपट्ट्या एसआरए अंतर्गत विशेष नियोजन क्षेत्र (स्पेशल प्लॅनिंग एरियाज/एसपीए) राहू नयेत. सदर विषाणूचा प्रतिबंध करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे आणि स्थानिक प्रशासनाकडून त्याबाबत दीर्घकालीन नियोजन होणे अतिशय महत्वाचे आहे.

V. प्रभावी स्थानिक प्रशासनासह स्थानिक क्षेत्र नियोजन विकसित केले पाहिजे. स्थानिक क्षेत्र योजनांमध्ये त्या क्षेत्राच्या विद्यमान लोकसंख्येला प्रदान करण्यात येणारे शिक्षण, आरोग्य सेवा आणि स्वच्छता सेवा यांचा समावेश असणे गरजेचे आहे.

VI. यासोबत प्रभाग, क्षेत्र आणि गल्ली/मोहल्ला यांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यासाठी घटनेतील ७४ व्या घटना दुरुस्ती कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. वरिष्ठांकडून कनिष्ठांकडे (टॉप-डाऊन) आदेश येण्याच्या पद्धतीवर अवलंबून न राहता योग्य प्रतिसाद देण्याहेतू विलक्षण सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गरजा समजावून घेणाऱ्या आपत्कालीन नियोजन समित्यांची स्थापना करण्यासाठी स्थानिक शासन विद्यमान सामुदायिक नेतृत्व आणि बिगर-नफा संस्थांशी भागीदारी करू शकतात.

VII. लॉकडाऊननंतर अलीकडेच केंद्र शासनाने जाहीर केलेली ‘प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) रेंटल हाऊसिंग योजना’ स्वागतार्ह पाऊल आहे. एमएमआर क्षेत्रामध्ये रेंटल हाऊसिंग योजनेला कार्यान्वित करण्यासाठी म्हाडाद्वारे स्थानिक शासन आणि राज्य शासन या दोघांच्या सहकार्याची गरज भासेल. एमएमआर क्षेत्रातील कामगारांना भेडसावणाऱ्या निवासस्थानाविषयीच्या आव्हानांवर मात करण्याच्या दृष्टीने रोजंदारीवर आणि अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या गरजा आणि उत्पन्नाची क्षमता विचारात घेणारा व शासनाकडून राबविण्यात येणारा रेंटल हाऊसिंग कार्यक्रम हे योग्य पाऊल असेल.

ABOUT YUVA

Youth for Unity and Voluntary Action (YUVA) is a non-profit development organisation committed to enabling vulnerable groups to access their rights. YUVA encourages the formation of people's collectives that engage in the discourse on development, thereby ensuring self-determined and sustained collective action in communities. This work is complemented with advocacy and policy recommendations. Founded in Mumbai in 1984, currently YUVA operates in the states of Maharashtra, Madhya Pradesh, Odisha, Assam and New Delhi.

At the community-level, through an integrated 360-degree approach, YUVA delivers solutions on issues of housing, livelihood, environment and governance. Through research, YUVA creates knowledge that enhances capacity building. Through partnerships in campaigns, YUVA provides solidarity and builds strong alliances to drive change.